**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २४३/२०२२**
**निशाणी क्र.२७ पुढे सुरू**

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ –</u>**

मी याद्वारे शपथेवर कथन करतो की,

**माझे नाव :– श्रीमंत इराप्पा सेलुकर.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पी. जी. नावंदर यांचेमार्फत :–</u>**

७. माझे शिक्षण एस.एस.सी, डी.एड पर्यंत झाले आहे. मी १९७७ मधे शिक्षक म्हणून मुक्तेश्वर प्राथमिक शाळेत नोकरीस लागलो. तेथे मी चार वर्ष काम केले. मला रूजू होताना रू.२९० – रू.३२० हा पदाच्या श्रेणीचा मुळ पगार होता. त्यानंतर मी जिल्हा परिषद हसेगाववाडी, ता. औसा येथे प्राथमिक शिक्षक म्हणून दिड वर्ष नौकरी केली. तेथून उत्का, ता. औसा येथे त्याच पदावर १९ वर्ष नौकरी केली. त्यानंतर धानोरा, ता. निलंगा येथे मुख्याध्यापक म्हणून ०५ वर्ष सन २००७ ते २०१२ मध्ये नौकरी केली. आरोपीचे गाव धानोरा आहे. मी सन २०१३ मध्ये सेवानिवृत्त झालो. हे म्हणणे खरे आहे की, चेतन हा माझा वर्गमित्र तसेच मित्र नव्हता.

८. मी माझया नोकरीमध्ये नेहमी येणे–जाणे करीत होतो. मला तीन मुले आहेत. विनोद हा मोठा मुलगा आहे. त्याचे शिक्षण बी.ए. हे २००४–२००५ च्या दरम्यान झाले आहे. हे मला माहित नाही की, विनोद व आरोपी चेतन हे वर्गमित्र आहेत. माझा मुलगा ग्रामसेवक म्हणून २०१२ पासून नौकरी करतो.

९. हे म्हणणे खरे आहे की, सोमेश नागनाथ, महेशंकर, ओमप्रकाश राचट्टे, जयशंकर कल्लाप्पा सोरडे हे माझया मुलाचे मित्र आहेत. हे मला माहित नाही की, सन २००९ मध्ये या मुलांनी फायनान्सचा व्यवसाय सुरू केला होता. हे मला माहित नाही की, सदर व्यवसायासाठी या मुलांनी जिल्हा निबंधक सहकारी संस्था, लातूर यांचेकडून लायसन्स घेतले होते. हे मला माहित नाही की, माझया मुलांनी सदर परवाना नुतणीकरण करण्यासाठी अर्ज दिले आहे. हे मला माहित

नाही की, सन २०१२ पर्यंत माझा मुलगा चेअरमन म्हणून या व्यवसायात होता. सन २०१३ मध्ये मी सरस्वती नगर, औसा येथे राहत होतो.

१०. हे मला माहित नाही की, मी दि.०१/११/२०१३ रोजी निळकंठ रमेश सलगर याचेसोबत सावकारी परवाना काढण्यासाठी अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, दि.०१/११/२०१३ रोजी मी भागीदारी पत्र तयार करून त्याच्यावर सह्या केल्या आहेत. हे मला माहित नाही की, सदरची सर्व कागदपत्रे मी निबंधक कार्यालयात सावकारी परवान्यासाठी दाखल केली आहेत. मी नगरसेवक मंजुषा हजारे हिला ओळखत नाही. मी दि.२५/१०/२०१३ रोजी तिच्याकडून रहिवासी प्रमाणपत्र तसेच चारि्त्रय प्रमाणपत्र घेतले नाही. निळकंठ सलगर याला मी ओळखत नाही.

११. विनोद आणि आरोपी चेतन यांच्यामध्ये झालेले व्यवहार मला माहित नाहीत. विनोद हा माझयासोबत राहतो. विनोद हा मला न विचारता कोणतेही काम करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, विनोद याने मला चार मित्रांसोबत भागीदारीमध्ये फायनान्सचा व्यवसाय करतो असे सांगितले होते. मला सन २००९ मध्ये विनोद याने फायनान्स व्यवसाय चार मित्रांसोबत सुरू केला असल्याबाबत काहीही सांगितले नाही.

१२. हे मला माहित आहे की, आरोपीच्या वडीलांच्या वीर मरणानंतर सन २००५-२००६ मध्ये आरोपीला इंडेन गॅसची एजन्सी मिळाली होती. सदर एजन्सीमध्ये कोण-कोण संचालक आहेत, हे मला माहित नाही. इंडेन गॅस एजन्सीच्या आरोपीच्या आईच्या नावाने आहे, त्यामुळे त्यात आरोपीचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी चेतन याला मी नोटीस पाठविली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी इंडेन गॅस एजन्सीला वेगळी नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी इंडेन गॅस एजन्सीच्या संचालकांना वेगळी नोटीस पाठविली नाही. महेशंकर राचट्टे व सोमनाथ मुक्ता हे माझया

मुलाचे जिवलग मित्र आहेत. सदर दोघे माझ्या परिचयाचे आहेत. मुलाचा व त्या दोघांचा काहीही संबंध नाही. आरोपी चेतन याच्या परिवाराविषयी मला माहिती नाही. मी इंडेन गॅस एजन्सीचे चालक म्हणून लायसन्सवर कोणाचे नाव आहे, हे पाहिले नाही.

१३. आरोपी माझ्याकडे दि.१६/१०/२०२१ रोजी पैसे मागण्यासाठी आला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याच दिवशी मी त्याला रक्कम दिली होती. मी एवढी मोठी रक्कम आरोपीव्यतिरिक्त इतर कोणाला दिली नाही. मी आरोपीला साक्षीदारांसमक्ष पैसे दिल्याबाबत कोणतेही लेखी कागदपत्र तयार केले नाही तसेच, कोणताही स्टॅम्प व करारनामा करून घेतला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला रक्कम दिल्याबाबत कोणताही कागदोपत्री दस्त दाखल केला नाही. आरोपीला रक्कम मिळाल्याबाबत कोणताही लेखी कागदपत्र तयार केला नाही.

१४. मी धनादेशाव्दारे अथवा डी.डी.व्दारे सदरची रक्कम आरोपीला दिली नाही. माझे पेन्शन्चे खाते आहे. दि.१६/१०/२०२१ रोजी पैसे काढून दिले असल्याबाबत बॅकेचे पासबूक दाखल केले नाही. माझ्या पगारातून आयकराची कपात होत होती. मी आयकर भरत नाही.

१५. आरोपीने बोरफळ रस्त्याला ४ ते ५ एकर जमीन खरेदी केल्याचे मी ऐकले आहे. हे मला माहित नाही की, आरोपीच्या पत्नीने गॅस एजन्सीच्या बाजुला मॉल सुरू केला आहे. आरोपीची गॅस एजन्सी ही ३ ते ४ एकर क्षेत्रावर बांधकाम करून उभी केली आहे. आरोपीच्या गॅस एजन्सीमध्ये १४ ते १५ लोक कामाला आहेत. हे मला माहित नाही की, आरोपीकडे गॅस वितरण करण्यासाठी १० ते १५ ट्रक व टॅम्पो आहेत. सन २०२०-२०२१ मध्ये कोव्हीडची साथ पसरली होती.

१६. निशाणी ३९ वरील धनादेश हा मी स्वत: बॅकेत सादर केला.

निशाणी ४४ वरील डिपोजीट स्लीपवरील मजकूर मी लिहिला आहे. मी दि.१३/०६/२०२२ रोजी बॅकेत गेलो होतो. बॅकेमध्ये स्लीप दिली असता तिचा अर्धा भाग बॅकेत ठेवला जातो व उर्वरित भाग आपल्याला दिला जातो. त्याच्यावर बॅकेचा शिक्का असतो. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ४४ वर बॅकेचा शिक्का व सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ३९ वरील मजकूर मी माझया हस्ताक्षरात लिहिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी बॅकेमध्ये कधीही चेक सादर केला नाही.

१७. मौजे धानोरा येथे आरोपीची वडीलोपार्जीत शेती आहे. आरोपी शेतीकडे लक्ष देत नाही. हे मला माहित नाही की, मी आरोपीला पाठविलेली नोटीस आरोपीला मिळाली आहे अथवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोस्टमन सोबत संगनमत करून मी निशाणी ४३ वरील पाकीट दाखल केले आहे.

१८. रमेश गुंडीबा सलगर याला मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, निळकंठ सलगर व विनोद सेलुकर हे फायनान्सची पिगमी गोळा करण्याचे काम करीत होते. हे मला माहित नाही की, इंडेन गॅस एजन्सीने विनोद सेलुकर व निळकंठ सलगर यांच्या फायनान्स कंपनीला आर्थीक मदत केली होती. हे मला माहित नाही की, २०११-२०१२ मध्ये इंडेन गॅस एजन्सीच्या कर्मचा-यांना या दोघांकडून फायनान्स उपलब्ध करून दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस सेक्युरीटी म्हणून दोन कर्मचा-यांचे चेक चेतन याने ठेवुन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी व निळकंठ सलगर यांनी सावकारीचा परवाना काढला होता. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१२ मध्ये सदर कर्मचा-यांच्या सेक्युरीटी म्हणून घेतलेल्या चेकचा गैरवापर करून दोन खोटी प्रकरणे दाखल केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दि.१२/०८/२०२२ रोजी एकाच दिवशी मी व रमेश गुंडीबा सलगर यांनी न्यायालयात संगनमताने प्रकरणे दाखल केली आहेत.

१९. हे मला माहित नाही की, इंडेन गॅस एजन्सीचे वार्षीक लेखापरिक्षण होते. हे मला माहित नाही की, सदर एजन्सीमध्ये करोडोचे व्यवहार होतात तसेच, ते लाखो रूपयांचा आयकर भरतात.

२०. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला चेकवरील रक्कम कधीही दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा व आरोपीमध्ये आर्थीक व्यवहार झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी आरोपीला चेकवरील रक्कम देण्याची ऐपत नाही. हे म्हणणे खरे नाही की, विनोद आणि आरोपी हे मित्र आहेत, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझया सरतपासातील परिच्छेद २ मधील मजकुर मी खोटा नमुद केला आहे.

२१. मी इंडेन गॅस एजन्सीकडून पैशाबद्दल कोणताही कागद लिहुन घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांसमक्ष आरोपीला पैसे दिल्याची बाब खोटी नमुद कली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला नोटीस पाठविली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला पाठविलेली नोटीस मिळाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादातील चेक बॅकेत दाखल न करता खोटा बॅक मेमो व खोटी डिपोजीट स्लीप दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे कोणतेही कायदेशीर देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र देउन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2025.10.01 13:38:33 +0530

**दि. ०१/१०/२०२५** **(श्री. आवटे पी. पी.)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औसा